दि सेतु को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई
ॐ सहनाववतु।। सहवीर्यं करवावहै।।

ऑडिट वर्ग "अ"

**४१ वा वार्षिक अहवाल**

**२०२४-२०२५**




# दि सेतु को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड

**(नोंदणी क्र. : ११६३/८४-८५)**

कार्यालय : १ व २, वैशाली अपार्टमेंटस्, टी. पी. एस्. III,
लोकनेते अण्णासाहेब वर्तक मार्ग, बोरिवली (प), मुंबई -४०० ०९२.
दूरध्वनी : ०२२-४७५११८८९ (मो.) : ८१६९३७७९०८
email : setucoopcreditborivali@gmail.com
web : www.setuco-opcredit.com

Scanned with CamScanner













Scanned with CamScanner

# संचालक मंडळ - सन २०२३ - २०२८

| क्र. | संचालकाचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश काशिनाथ वर्तक | अध्यक्ष |
| २ | श्री. चिंतामण भालचंद्र ठाकूर | उपाध्यक्ष |
| ३ | श्री. नरेंद्र दाजी वर्तक | संचालक |
| ४ | श्री. भालचंद्र पांडुरंग जाधव | संचालक |
| ५ | श्री. भूषण काशिनाथ वर्तक | संचालक |
| ६ | श्री. धनेश भास्कर वर्तक | संचालक |
| ७ | श्री. संजीव विनायक राऊत | संचालक |
| ८ | श्री. भरत पुरूषोत्तम चौधरी | संचालक |
| ९ | श्री. विलास पांडुरंग सावे | तज्ज्ञ संचालक |
| १० | सौ. जिज्ञासा कुंदन म्हात्रे | संचालिका |
| ११ | सौ. उज्वला रामकृष्ण पाटील | संचालिका |
| १२ | सौ. सुमती दत्तात्रय अरण्य | संचालिका |
| १३ | श्री. सोनु आत्माराम आरेकर | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**-: विधी सल्लागार :-**

ॲड. श्रीम. कविता सं. पाटील, पालघर
ॲड.श्री. एस्.के.कलाल, मुंबई
ॲड.श्री. हितेश दि. पटेल, मुंबई
ॲड. श्रीम. कलावती कुडू-डहाणू
ॲड.श्री. अजिंक्य ठाकुर, दहिसर
ॲड.श्री. प्रदिप स.म्हात्रे, विरार
ॲड.श्री. जयंत अनंत राऊत, पालघर
ॲड. श्रीम. देवश्री राऊत, वसई
ॲड. श्रीम. दिप्ती ह. राऊत, डहाणू

**-: वैधानिक लेखापरीक्षक :-**

मे. किरण दामले ॲण्ड कंपनी सनदी लेखापाल

**-: समवर्ती लेखापरीक्षक :-**

मे. वृषल चौधरी ॲण्ड कंपनी

**✻ बँकर्स ✻**

✻ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
✻ दि सारस्वत को.ऑप बँक लि.
✻ बसिन कॅथॉलिक को.ऑप.बँक लि.
✻ वसई विकास सहकारी बँक लि.
✻ म्युनिसिपल को.ऑप. बँक लि.
✻ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
✻ टी.जे.एस्.बी. सहकारी बँक लि.
✻ डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
✻ एन.के.जी.एस्.बी.बँक लि.
✻ युनिटी स्मॉल फायनान्स बँक
✻ कॉसमॉस सहकारी बँक लि.
✻ बँक ऑफ बडोदा
✻ ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.
✻ मॅको बँक, मुंबई.
✻ स्टेट बँक ऑफ इंडिया

## अनुक्रमणिका


१. वार्षिक सभेची सूचना . . . . ३
२. वार्षिक अहवाल . . . . ४
३. वैधानिक लेखापरीक्षण अहवाल . . . . ९
४. सेतु एका दृष्टीक्षेपात . . . . ११
५. ताळेबंद . . . . १२
६. वार्षिक नफा-तोटा पत्रक . . . . १६
७. परिशिष्ट - ब - येणी, देणी, इतर खर्च व उत्पन्न . . . . १८
८. परिशिष्ट - अ - अंदाज पत्रक . . . . १९
९. सेतुची दृष्टीक्षेपातील वाटचाल . . . . २०
१०. सन २०२४-२०२५ चा शाखानिहाय कार्याचा तपशील . . २१
११. सेतुचा अधिकारी व कर्मचारी वर्ग. . . . २२
१२. परिशिष्ट - इ- सभासदांना विशेष विनंती . . . . २३
१३. सभासदांना नम्र विनंती . . . . २६
१४. ऋणनिर्देश. . . . . २७
१५. शाखा कार्यालयांचे पत्ते . . . . २८




Scanned with CamScanner

### ✲ सल्लागार समिती - सन २०२३ -२०२८ ✲

| | |
|---|---|
| • श्री. प्रकाश का. वर्तक | अध्यक्ष (पदसिध्द) |
| • श्री. पुरुषोत्तम वि.वर्तक | निमंत्रक |
| • श्री. दिगंबर वा.राऊत | सदस्य |
| • श्री. गोपीनाथ ज. वर्तक | सदस्य |
| • श्री. जयवंत भा. म्हात्रे | सदस्य |
| • श्री. कमळाकर गो.चौधरी | सदस्य |
| • श्री. प्रमोद ज. पाटील | सदस्य |

### ✲ व्यवसाय वृद्धी समिती-बोरिवली - सन २०२३-२०२८ ✲

| | |
|---|---|
| • श्री. पांडुरंग दा. वर्तक | अध्यक्ष |
| • श्री. प्रदिप ह. सावे | निमंत्रक |
| • श्री. मिलिंद प्र. पाटील | सदस्य |
| • श्री. नरोत्तम क. चुरी | सदस्य |
| • श्री. राजेंद्र दा. चौधरी | सदस्य |
| • श्री. सुनिल अ. वर्तक | सदस्य |
| • श्री. नंदकुमार ना. वर्तक | सदस्य |
| • श्री. तुषार मो. पाटील | सदस्य |
| • श्री. ज्ञानेश्वर मो. म्हात्रे | सदस्य |

## व्यवसाय वृद्धी समिती शाखानिहाय - सन २०२३ - २०२८

### ✲ सफाळे ✲

| | |
|---|---|
| • श्री. संजीव काशिनाथ म्हात्रे | अध्यक्ष |
| • श्री. नितीन रघुनाथ वर्तक | निमंत्रक |
| • श्री. प्रदिप मोरेश्वर वर्तक | सदस्य |
| • श्री. पंकज अरुण म्हात्रे | सदस्य |
| • श्री. नितीन जगन्नाथ वर्तक | सदस्य |
| • श्री. प्रदिप कृष्णाजी म्हात्रे | सदस्य |
| • श्री. अशोक भालचंद्र वर्तक | सदस्य |
| • श्री. वसंत जनार्दन ठाकूर | सदस्य |

### ✲ माहीम ✲

| | |
|---|---|
| • श्री. विजय लक्ष्मण सावे | अध्यक्ष |
| • श्री. विजयकुमार जगन्नाथ पाटील | निमंत्रक |
| • श्री. जयंत गणपत वर्तक | सदस्य |
| • श्री. सुनिल भास्कर राऊत | सदस्य |
| • श्री. अनिल नानाजी राऊत | सदस्य |
| • श्री. जगदिश वासुदेव चुरी | सदस्य |
| • श्री. नागेश मधुकर चुरी | सदस्य |
| • श्री. कुंदन जगन्नाथ पाटील | सदस्य |
| • श्रीम. शैला बाळकृष्ण राऊत | सदस्य |

### ✲ चिंचणी ✲

| | |
|---|---|
| • डॉ. श्री. विलास माधव सावे | अध्यक्ष |
| • श्री. हरेश आत्माराम चुरी | निमंत्रक |
| • श्री. काशिनाथ भाई पाटील | सदस्य |
| • श्री. दत्तात्रेय बाबुराव पाटील | सदस्य |
| • श्री. जयप्रकाश नारायण पाटील | सदस्य |
| • कु. अरुणा काशिनाथ चुरी | सदस्य |
| • श्री. कमलेश सुरेंद्र सावे | सदस्य |
| • श्री. सतिश परशुराम सावे | सदस्य |

### ✲ बोर्डी ✲

| | |
|---|---|
| • श्री. भुपेंद्र हरिश्चंद्र सावे | अध्यक्ष |
| • श्री. अविनाश भिकाजी सावे | निमंत्रक |
| • श्री. दिलीप रामचंद्र सावे | सदस्य |
| • श्री. शाम भालचंद्र पाटील | सदस्य |
| • श्री. यतीन नारायण सावे | सदस्य |
| • श्री. राजन जगन्नाथ चुरी | सदस्य |
| • सौ. रूपाली जगदीप सावे | सदस्य |
| • सौ. मिलन संजय पाटील | सदस्य |

### ✲ पालघर ✲

| | |
|---|---|
| • श्री. संदेश रमाकांत वर्तक | अध्यक्ष |
| • श्री. संतोष अशोक चुरी | निमंत्रक |
| • श्री. संजय रघुनाथ घरत | सदस्य |
| • श्री. आशिष अनिल पाटील | सदस्य |
| • श्री. प्रशांत अनंत पाटील | सदस्य |
| • श्री. कल्पेश दत्तात्रेय म्हात्रे | सदस्य |



Scanned with CamScanner

# दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड

(नोंदणी क्रमांक ११६३/८४-८५)
१ व २, वैशाली अपार्टमेंटस्, टी.पी.एस.III, लोकनेते अण्णासाहेब वर्तक मार्ग, बोरिवली (प), मुंबई - ४०००९२.

## ❊ ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ❊

दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड (सेतु) ची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार, दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.०० वा. 'फ्रेंडस् बँक्वेट', एच्.टी. देसाई कंपाउंड, रुस्तमजी इंटरनॅशनल शाळेजवळ, जयवंत सावंत रोड, दहिसर (प.), मुंबई ४०० ०६८. येथे आयोजित केली आहे. तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

## ❊ सभेपुढील विषय ❊

१) दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल संमत करणे.

३) अ) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा तोटा पत्रक व ताळेबंदास मान्यता देणे.
ब) सन २०२४-२०२५ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२४-२०२५ चा वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल स्वीकारणे. मागील लगतच्या वर्षाच्या लेखा परीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे व अहवाल स्वीकारणे.

५) सन २०२५ -२०२६ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.

६) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.

७) संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबद्दल माहिती देणे.

८) वसुलीचे अधिकार अबाधित ठेऊन थकित कर्ज रकमांचे निर्लेखन करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत.

९) सभासदांकडून सभेपूर्वी किमान चार दिवस अगोदर लेखी स्वरूपात आलेल्या सूचनांवर चर्चा करणे.

१०) ४१ व्या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

११) मान. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९२.
दिनांक : २०/०८/२०२५

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**सोनु आ. आरेकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

## ❊ विशेष सूचना ❊

१) पर्याप्त गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ती परत अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) सादर केलेला अहवाल, नफातोटा पत्रक व ताळेबंद यासंबंधी खुलासा हवा असल्यास कृपया सभेपूर्वी किमान चार दिवस आधी (दिनांक ०९-०९-२०२५ पर्यंत) लेखी सूचना द्यावी, म्हणजे त्याबाबतचा खुलासा सभेत करणे सोयीचे होईल.

३) वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची प्रत, माहिती व अवलोकनासाठी बोरिवली येथील मध्यवर्ती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

४) सभेस येताना सभासदांनी कृपया वार्षिक अहवालाची प्रत सोबत आणावी.

५) ४१ व्या वार्षिक अहवालाची प्रत सेतुच्या www.setuco-opcredit.com या वेबसाईट वर उपलब्ध आहे.



Scanned with CamScanner

# ४१ वा वार्षिक अहवाल
## ❖ सन २०२४-२०२५ ❖

प्रिय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सस्नेह नमस्कार,

सेतुच्या संचालक मंडळाच्या वतीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा ४१ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच सन २०२५-२०२६ या वर्षाचे अंदाज पत्रक सादर करताना आम्हाला अपार आनंद व अभिमान वाटतो.

आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी आपण ठेवी संकलन व कर्ज वितरणाचे अनुक्रमे रु.१४५.०० कोटी व रु. ११०.०० कोटींचे उद्दीष्ट निश्चित केले होते. अथक प्रयत्न आणि नियोजनबद्ध कार्यप्रणालीच्या बळावर ३१ मार्च २०२५ अखेर ठेवी रु. १४७.८८ कोटी व कर्ज रु. १०२.२० कोटी या उल्लेखनीय टप्प्यांवर पोहोचण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

आजच्या स्पर्धात्मक आर्थिक युगात खाजगी बँकांच्या आकर्षक योजना आणि प्रलोभने, क्रेडिट-डेबिट कार्ड, नेट बँकींग यांसारख्या अत्याधुनिक सुविधा, व्यावसायिक स्पर्धा तसेच कठोर सरकारी बंधने ही आपल्या समोरची मोठी आव्हाने आहेत. या सर्व अडथळ्यांवर मात करुन मिळवलेले यश हे केवळ आपल्या सर्व सभासदांचे प्रेम, विश्वास, सक्रिय सहकार्य आणि प्रत्येक स्थानिक पातळीवरच्या व्यवसायवृद्धी समितींच्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहे. संस्थेचा अध्यक्ष या नात्याने संचालक मंडळाच्या वतीने मी आपणां सर्वांचे आभार मानतो आणि ४१ वर्षांची आपली ही संस्था आज ताठ मानेने उभी आहे या विषयी आनंद व्यक्त करतो.

मी खास नमुद करू इच्छितो की ४० व्या सर्वसाधारण सभेत आम्ही काही नवीन उत्पादने आणि सेतूची व्यवसाय व्यापकता वाढवण्याच्या उद्देशाने आपणांस आश्वासित केले होते. आज मला सांगायला अत्यंत आनंद होतो की ह्या आर्थिक वर्षात माहीम शाखेत SDV (सेल्फ डिपॉझिट व्हॉल्ट) सुविधा ग्राहकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आली आहे. सुरवातीला तीन शाखांमध्ये सुरु केलेल्या 'सोने तारण कर्ज' योजनेची व्याप्ती वाढवून आता सर्व शाखांमध्ये विस्तारण्याचा आमचा मानस असून, त्या दृष्टीने आम्ही सकारात्मक पावले उचलली आहेत.

याचप्रमाणे वसईमध्ये आपली सेतूची शाखा असावी, हे अनेक वर्षांचे स्वप्न या वर्षी पूर्णत्वास नेले आहे. दि. १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर वसई (रमेदी परिसरात) सेतू शाखेचा शुभारंभ करून व्यवसायवृद्धीच्या दिशेने एक भक्कम आणि आशादायक पाऊल टाकले आहे. लवकरच डहाणू येथे नवीन शाखा उघडण्याचा मानस आहे.

सेतु पतसंस्थेच्या या यशस्वी प्रवासात सन्माननीय सभासदांबरोबरच तज्ज्ञ, कुशल व अनुभवी संचालक मंडळ, माननीय सल्लागार समिती, विविध कार्यकारी समित्या, शाखा व्यवसायवृद्धी समित्या, कार्यक्षम व निष्ठावान अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग तसेच दैनंदिन ठेव प्रतिनिधी या सर्वांचे फार मोलाचे योगदान लाभले आहे. पतसंस्थांवर असलेली अनेक बंधने आणि बँकांबरोबरची तांत्रिक स्पर्धा अशी अनेक आव्हाने उभी असताना व अनुत्पादक कर्जामुळे सर्वच आर्थिक संस्थांच्या उत्पन्नावर एकीकडे विपरीत परिणाम झाला असताना केवळ प्रभावी जनसंपर्क, धोरणात्मक निर्णय घेण्याची क्षमता, कार्यकर्त्यांचे संघटन, सहकार कायद्याचे सखोल ज्ञान आणि उत्तम ग्राहक सेवा यामुळेच आपल्या पतसंस्थेचा पाया भरभक्कम असून आपली आर्थिक घोडदौड कायम राखण्यात आपण यशस्वी झालो आहोत. आर्थिक क्षेत्रांमध्ये वेळोवेळी झालेले बदल व घडामोडींशी मिळते जुळते घेऊन, ध्येय व कार्य यांचा पाठपुरावा करीत, आपुलकीचे ग्राहकसंबंध जपत, व्यावसायिक व्यवस्थापन व तंत्रज्ञानाधिष्ठित अत्याधुनिक सेवा यांच्या बळावर पुढे जाण्याचा आपला प्रयत्न व प्रवास सातत्यपुर्णरित्या चालुच राहील. नजिकच्या काळात आपली सेतु एक उत्कृष्ट आर्थिक संस्था व्हावी अशी संकल्पना बाळगून आहोत.

आपल्या सर्व सभासदांना नम्र आवाहन आहे की, संस्थेच्या ठेवी व कर्जयोजनांचा प्रचार-प्रसार करुन व स्वतः लाभ घेऊन ''सेतु'' च्या व्यवसायवृद्धीत आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.

संचालक मंडळाच्या वतीने,

**प्रकाश का. वर्तक**

अध्यक्ष



Scanned with CamScanner

**१. संचालक मंडळ :-** कार्यात्मक वाढीसाठी तसेच सेतुच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी सेतुच्या संचालक मंडळाने यशस्वीपणे प्रयत्न केले आहेत. अहवाल सालात सेतुच्या संचालक मंडळाच्या एकूण १७ सभा झाल्या. त्यात माननीय संचालकांची सरासरी उपस्थिती ८०% होती. सदर सभांमध्ये सर्व संचालकांचा सक्रिय सहभाग होता.

मासिक सभेतील नेहमीच्या विषयांव्यतिरिक्त महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय, व्यवसायवृद्धी, व्याजदरातील बदल, गुंतवणूक, थकीत कर्जवसुली इत्यादी विषयांवर सखोल व सविस्तर चर्चा करुन बहुमताने अंतिम निर्णय घेण्यात आले. तसेच न्यायप्रविष्ठ बाबींवर विधीसल्लागारांचे मत घेऊन त्याप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली. ठेवी संकलन, कर्ज वितरण, कर्ज वसुली या बाबींवर काटेकोरपणे लक्ष दिले गेले. सेतुच्या व्यवसाय विषयक कामामध्ये सुसूत्रता व गती येण्याच्या उद्देशाने संचालक मंडळाच्या अखत्यारीत विभागवार समित्यांची रचना करण्यात आली आहे. त्या सर्व समित्या आपापल्या विभागाची जबाबदारी प्रभावीपणे सांभाळीत असून त्याचा सेतुच्या व्यवसायवृद्धीवर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

**संचालक मंडळ सभा उपस्थिती तक्ता (२०२४ ते २०२५)**

| क्र. | संचालकाचे नाव | पद | एकुण सभा | उपस्थिती | क्र. | संचालकाचे नाव | पद | एकुण सभा | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश काशिनाथ वर्तक | अध्यक्ष | १७ | १७ | ७. | श्री. संजीव विनायक राऊत | संचालक | १७ | १५ |
| २. | श्री. चिंतामण भालचंद्र ठाकूर | उपाध्यक्ष | १७ | १३ | ८. | श्री. भालचंद्र पांडुरंग जाधव | संचालक | १७ | १३ |
| ३. | श्री. नरेंद्र दाजी वर्तक | संचालक | १७ | ६ | ९. | श्री. विलास पांडुरंग सावे | तज्ञ संचालक | १७ | १७ |
| ४. | श्री. भूषण काशिनाथ वर्तक | संचालक | १७ | १६ | १०. | सौ. जिज्ञासा कुंदन म्हात्रे | संचालिका | १७ | १५ |
| ५. | श्री. भरत पुरुषोत्तम चौधरी | संचालक | १७ | १६ | ११. | सौ. उज्वला रामकृष्ण पाटील | संचालिका | १७ | १० |
| ६. | श्री. धनेश भास्कर वर्तक | संचालक | १७ | १५ | १२. | सौ. सुमती दत्तात्रेय अरण्य | संचालिका | १७ | १० |

**२. सल्लागार समिती :-** अहवाल वर्षात सल्लागार समितीच्या एकूण चार सभा झाल्या. आवश्यकतेनुसार त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून चर्चा करण्यात आली. कर्मचारी सेवा नियमावली, व्याजदरातील बदल, थकीत कर्जे इ. बाबत माननीय सल्लागार समितीकडून बहुमोल मार्गदर्शन मिळाले.

**३. स्थानिक व्यवसाय वृद्धि समिती :-** संस्थेच्या दैनंदिन कामकाजात सुसूत्रता येण्याच्या दृष्टिने संचालक मंडळाने मुख्य कार्यालय स्तरावर नियुक्त केलेल्या उपसमित्या व्यतिरिक्त शाखा स्तरावर नियुक्त केलेल्या बोरिवली, सफाळे, माहीम, चिंचणी, बोर्डी व पालघर या सहा शाखांच्या स्थानिक व्यवसाय वृद्धि समित्यांनी सेतुच्या दैनंदिन कामात तसेच कार्यविस्तार, आर्थिक वाटचाल व कर्जवसुली या बाबतीत भरीव योगदान दिले. त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद! स्थानिक समितीमध्ये सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे. सर्व शाखा स्थानिक समित्यांच्या सभांचे अहवाल वर्षात नियमितपणे आयोजन करण्यात आले हे कौतुकास्पद आहे.

## ✼ अहवाल वर्षकालीन कार्य ✼

**१. सभासद :-** अहवाल सालात सेतुचे एकूण ८९२ नवीन सभासद झाले. राजीनामा, स्थलांतर व मृत्यू इत्यादी कारणास्तव १७४ सभासदांचे सभासदत्त्व संपुष्टात आले. सेतुच्या सभासद संख्येमध्ये ७१८ ने वाढ होऊन ३१ मार्च २०२५ अखेरीस सेतुचे एकूण सभासद १३,२६७ इतके आहेत. सभासद संख्या वाढीसाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यासाठी



Scanned with CamScanner

सर्व सभासदांनी आपले कुटुंबीय, आप्तेष्ट, कार्यालयीन सहकारी, मित्र परिवार यांना सभासद करून सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

२. **भागभांडवल :-** सेतुचे भागभांडवलाचे उद्दिष्ट रू.५.७५ कोटी इतके ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात रू. ५.६७ कोटी इतके भागभांडवल जमा केले. गतवर्षीच्या रू ५.५३ कोटीच्या तुलनेत या आर्थिक वर्षात भागभांडवलामध्ये २.५३% इतकी वाढ झालेली आहे.

३. **ठेवी :-** संस्था आणि सभासद यांच्यातील विश्वास कायम राखण्यासाठी कटिबद्ध असणे हे सर्व संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचे आद्य कर्तव्य आहे. संस्थेत आकर्षक विविध ठेव योजना आहेत. अहवाल साल अखेर सेतुचे ठेवींचे उद्दिष्ट रू १४५.०० कोटी इतके ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात रु. १४७.८८ कोटी इतक्या ठेवी संकलित झाल्या आहेत. गतवर्षीच्या रु. १३२.८४ कोटीच्या तुलनेत या आर्थिक वर्षात ठेवींमध्ये ११.३२% इतकी वाढ झाली आहे. ठेवींमध्ये सातत्याने होत असलेली वाढ हे ठेवीदारांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

४. **गुंतवणूक :-** सेतुने गुंतवणूक उद्दिष्ट रू.६१.१० कोटी इतके ठेवले होते. ३१ मार्च २०२५ अखेरीस सेतुची गुंतवणूक रू. ६७.६५ कोटी इतकी आहे. गतवर्षी रु. ६२.८४ कोटी इतकी गुंतवणूक केली होती. गतवर्षीच्या तुलनेत गुंतवणुकीमधे ७.६५% इतकी वाढ झालेली आहे. सेतुकडे असलेला अतिरिक्त निधी तसेच वैधानिक बाबींची पूर्तता यांचा विचार करून गुंतवणूकीचा निर्णय घेण्यात आला. गुंतवणूक करण्यापूर्वी ज्या बँकांमध्ये गुंतवणूक करावयाची आहे, त्या बँकेचा मागील तीन वर्षांचा ताळेबंद, आर्थिक स्थिती, ऑडिट वर्ग, स्वनिधी, बँकींग क्षेत्रातील घडामोडी इत्यादींचा अभ्यास करून नियमानुसार गुंतवणूक केलेली आहे.

५. **कर्जे :-** सेतुने या वर्षी रू. ११०.०० कोटी इतके कर्जाचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यातील रू. १०२.२० कोटी इतक्या रक्कमेच्या कर्जाचे उद्दिष्ट साध्य केले आहे. मागील वर्षीच्या रु. ९४.५८ कोटीच्या तुलनेत कर्ज रक्कमेत ८.०६ % इतकी वाढ झालेली आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात कर्जवितरणासाठी प्रभावी मार्केटिंग करून कर्जाचे ठेवीशी प्रमाण (C.D. Ratio) ६०.१३% पर्यंत ठेवण्यास आपण यशस्वी झालो आहोत.

**अहवालकालीन वर्षात कोणत्याही संचालकाला सेतुने विनातारण कर्ज दिलेले नाही. तसेच संचालकांच्या नातेवाईकांनाही मर्यादेपेक्षा जास्त विना तारण कर्ज दिलेले नाही.**

६. **खेळते भांडवल :-** सेतुचे दि. ३१ मार्च २०२४ अखेर खेळते भांडवल रू.१६६.८५ कोटी इतके होते. ३१ मार्च २०२५ अखेर सेतुचे खेळते भांडवल रू १८२.२५ कोटी इतके झाले. खेळत्या भांडवलात गतवर्षीच्या तुलनेत ९.२३% इतकी वाढ झाली.

उपरोक्त आकडेवारीनुसार गतवर्षीच्या तुलनेत भागभांडवल, ठेवी, कर्ज, खेळते भांडवल या सर्व आर्थिक कार्यनिष्पत्तीत वाढ करण्यात आपणां सर्वांच्या सहकार्यामुळे यश आले हे नमूद करताना आनंद होत आहे.

७. **कर्जवसुली :-** प्रयत्न करूनही जी कर्जे अनुत्पादित होतात त्यांच्या वसुलीसाठी संचालक मंडळ सुनियोजित पद्धतीने सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. विशेष वसुली अधिकारी, कर्ज वसुली समितीचे समन्वयक आणि संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे वर्ष अखेरीस थकबाकी नियंत्रणात



Scanned with CamScanner

ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच ढोबळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ४.३८% वरुन ३.५२% इतके आहे.

८. **वैधानिक लेखापरीक्षण :-** वैधानिक लेखापरीक्षक मे. किरण दामले अँड कंपनी, चार्टर्ड अकाउन्टंटस् (पॅनेल क्रमांक. अ-१७०३०) यांनी सन २०२४-२५ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. मे. किरण दामले अँड कंपनी, चार्टर्ड अकाउन्टंटस् आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन व सूचनांबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

**सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात संस्थेला ऑडिट वर्ग ''अ'' मिळालेला आहे.**

९. **अनुत्पादित कर्जे (Non Performing Assets)** सहकारी पतसंस्थांना लागू असलेल्या सुधारीत नियमाप्रमाणे सेतुची ६ महिन्यांपेक्षा जास्त काळ अनियमित कर्जे, ढोबळ अनुत्पादित कर्जे (Gross NPA) रू. ३,५९,४९,२४३/- इतकी आहेत. शिल्लक (outstanding) कर्जाशी त्याचे प्रमाण ३.५२% इतके आहे. सेतुची ३१ मार्च २०२५ अखेर बुडीत कर्जासाठी असलेली तरतूद रू.४,०१,६७,१७७/- व अनुत्पादित कर्जासाठी असलेली तरतूद रू. ८१,८०,३८६/- लक्षात घेता सेतुच्या निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०% इतके आहे. थकीत कर्जाच्या वसुलीसाठी आपण प्रयत्नशील आहोत. ही रक्कम कमीत कमी ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न संचालक मंडळातर्फे सुरु आहेत.

**बोर्डी शाखेचे अनुत्पादित कर्जाचे प्रमाण सुरुवातीपासूनच शुन्य टक्के आहे. हे नमुद करण्यास आम्हांला विशेष आनंद वाटतो.**

## अनुत्पादित कर्ज स्थितिदर्शक तक्ता

| | |
|---|---|
| अनुत्पादित कर्जे शिल्लक दि. ०१-०४-२०२४ | रु. ४,१४,२७,९६३/- |
| वजा-वसुली व सुधारीत श्रेणी | रु. ७५,२०,२६३/- |
| अधिक-नवीन अनुत्पादित कर्जे | रु. २०,४१,५४३/- |
| अनुत्पादित कर्जे शिल्लक दि. ३१-३-२०२५ | रु. ३,५९,४९,२४३/- |

१०. **समवर्ती लेखापरीक्षण :-** लेखापरीक्षक मे. वृषल चौधरी अँड. कंपनी चार्टर्ड अकाउन्टंटस् यांनी १-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या कालावधीचे समवर्ती लेखापरीक्षण पूर्ण केले आहे.

रजिस्टर्ड मॉर्गेज, इक्विटेबल मॉर्गेज, KYC नॉर्म्स, दैनंदिन बचत ठेव, कर्ज मागणी अर्ज यांच्या पूर्ततेबाबत तसेच सेतुच्या दैनंदिन कार्यप्रणाली व कर्जवितरणोत्तर देखरेख व्यवस्था या बाबतीत समाधान व्यक्त करून त्यांनी उपयुक्त सूचना केल्या आहेत. मे.वृषल चौधरी अँड.कंपनी, चार्टर्ड अकाउन्टंटस् यांचा तिमाही अहवाल प्राप्त झाल्यानंतर, लेखापरीक्षकांनी केलेल्या सूचनांची पूर्तता करण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

११. **सभासद कल्याण निधी :-** गंभीर आजाराच्या वेळी वैद्यकीय दाखल्यासह नियम व अटीनुसार सभासद कल्याण निधी योजने अंतर्गत सेतु तर्फे सभासदांना लेखी मागणीवरून कमाल रू. १५,०००/- पर्यंत वैद्यकीय अर्थसहाय्य दिले जाते. या आर्थिक वर्षात वैद्यकीय अर्थसहाय्यासाठी एकाच सभासदाकडून अर्ज प्राप्त झाला होता. संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर नियम व अटीनुसार एकूण रू.११,००० /- इतक्या वैद्यकीय अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले.



Scanned with CamScanner

तसेच सेतुतर्फे मृत सभासदांच्या वारसाच्या लेखी मागणीवरून कमाल रू. ५,०००/- चे अर्थसहाय्य दिले जाते. अहवालसाली एकूण तीन मृत सभासदांच्या वारसांना रू १५,०००/- चे अर्थसहाय्य देण्यात आले.

**१२. सामाजिक कृतज्ञता निधी :-** सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून कार्यरत असणाऱ्या शासन मान्यताप्राप्त सेवाभावी संस्थांना आपली संस्था सहाय्य करीत असते.

**१३. निव्वळ नफ्याची विभागणी :-** सन २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात सेतुला रु. २,४६,३७,६७७.६४ इतका निव्वळ नफा झाला आहे. आर्थिक संस्थेसमोरची आव्हाने, खाजगी बँकांची प्रलोभने, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, नेट बँकिंग इत्यादी सुविधा साधने त्याचप्रमाणे व्यावसायिक स्पर्धा, सरकारी बंधने इत्यादी कारणांमुळे आपल्या सारख्या पतसंस्थांना निव्वळ नफ्यात वाढ करणे खूपच आव्हानात्मक होते. परंतु यावरही मात करून आपण सेतुच्या इतिहासातील सर्वोच्च नफ्याची नोंद केली आहे.

**गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी निव्वळ नफ्यामध्ये ४०.५७%ने वाढ झाली आहे.** दि. २५-०७-२०२५ रोजीच्या संचालक मंडळाच्या मासिक सभेमध्ये १२% दराने लाभांश मंजूर करून त्याचे वाटप ४१ व्या वार्षिक सभेच्या मंजुरीनंतर सभासदांच्या बचत खात्यात जमा करण्यात यावे असे ठरविण्यात आले. सदर वाटपास आपण या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी द्यावी अशी शिफारस संचालक मंडळाच्या वतीने करीत आहोत. त्याचप्रमाणे सर्वसाधारण सभेने खालीलप्रमाणे नफा विभागणीसही मान्यता द्यावी ही विनंती.

| | रूपये | रूपये |
|---|---|---|
| गतवर्षीय शिल्लक नफा | ५९०.५२ | |
| चालू वर्षीय नफा | २,४६,३७,६७७.६४ | २,४६,३८,२६८.१६ |
| | | |
| **वजा** | | |
| वैधानिक राखीव निधी (२५%) | ६१,६०,०००.०० | |
| सर्वसाधारण राखीव निधी | २५,००,०००.०० | |
| लाभांश १२% | ६६,९४,१८३.०० | |
| इमारत निधी | ५७,५०,०००.०० | |
| इमारत दुरूस्ती निधी | ३,००,०००.०० | |
| सामाजिक कृतज्ञता निधी | १,००,०००.०० | |
| सहकार शिक्षण निधी | १,००,०००.०० | |
| सभासद कल्याण निधी | २,५०,०००.०० | |
| कर्मचारी कल्याण निधी | ३,००,०००.०० | |
| कर्मचारी उपदान निधी (ग्रॅच्युईटी) | ४,००,०००.०० | |
| तंत्रज्ञान विकास निधी | १५,००,०००.०० | |
| निवडणूक निधी | ५,८४,०००.०० | **२,४६,३८,१८३.००** |
| **शिल्लक सन २०२५-२०२६ करीता** | | **८५.१६** |



Scanned with CamScanner

# वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५ ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

## वैधानिक लेखापरीक्षकाचा आर्थिक पत्रकांबाबत अहवाल :-

१. आम्ही दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.या संस्थेचा सोबत जोडलेला ३१ मार्च २०२५ रोजीचा ताळेबंद आणि त्याच तारखेस संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रके, महत्त्वाच्या अकाऊंटिंग पॉलिसीचा गोषवारा व आर्थिक पत्रकात समाविष्ट असलेली इतर स्पष्टीकरणे देणाऱ्या माहितीचे लेखापरीक्षण केले आहे.

## आर्थिक पत्रकांची व्यवस्थापकीय जबाबदारी :-

२. दि सेतु को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० व त्या अंतर्गत येणाऱ्या नियमानुसार आर्थिक पत्रके बनविण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय मंडळाची असून त्यामध्ये आर्थिक पत्रके बनविताना अंतर्गत आराखडा व रचना तयार करणे, अंमलात आणणे व देखभाल करून आर्थिक पत्रके बनविणे की जेणेकरुन त्यामध्ये महत्त्वाची खोटी किंवा चुकीची माहिति /विधाने नसावीत की जी त्रुटीने/चुकीने किंवा अफरातफरीमुळे असोत.

## लेखापरीक्षकांची जबाबदारी :-

३. आमची जबाबदारी लेखापरीक्षण केल्यानंतर लेखापरीक्षणानुसार ह्या आर्थिक पत्रकांबाबत मत प्रदर्शित करण्याची आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० यांनी निर्देशित केलेल्या ऑडिट स्टँडर्डस्प्रमाणे आम्ही लेखापरीक्षण केले आहे. या स्टँडर्डस्प्रमाणे आम्हाला लेखापरीक्षण करताना नैतिक जबाबदारी घेऊन असे नियोजन व रचना करावी लागते की पुरेसा विश्वास प्राप्त व्हावा जेणेकरून ह्या आर्थिक पत्रकात लक्षात येण्याजोग्या त्रुटी /चुका राहू नयेत.

४. लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकातील रक्कमा, दर्शविलेले तक्ते व विधाने याबाबत लेखापरीक्षण कार्यपध्दती वापरून लेखापरीक्षण पुरावा जमविणे याचा समावेश आहे. अवलंबिलेल्या लेखापरीक्षण कार्यपध्दती या लेखापरीक्षकांच्या सुज्ञतेनुसार व जोखीमेसह असून आर्थिक पत्रकांमध्ये त्रुटी / चुका राहू नयेत की त्या अफरातफरीमुळे किंवा चुकीमुळे असोत. सदर जोखीमेबाबत व लेखापरीक्षण कार्यपध्दतीबाबत निर्णय घेताना व योग्यवेळी योग्य लेखापरीक्षण पध्दती वापरताना लेखापरीक्षण संस्थेची आर्थिक पत्रके बनविणे व योग्य मांडणी करणेबाबतची संस्थेची अंतर्गत नियंत्रण रचना पध्दती विचारात घेतात. वापरलेल्या अकाऊंटींग पॉलिसीची योग्यता, अनुसरलेले हिशोबाचे तक्ते व व्यवस्थापनाने तयार केलेले सार्थ अंदाज तसेच एकंदरीत आर्थिक पत्रकाच्या मांडणीबद्दल मूल्यांकन करणे याचा देखील लेखापरीक्षणात समावेश आहे.

५. आमचा विश्वास आहे की आम्ही मिळविलेले लेखापरीक्षण पुरावे, आमचे मत मांडण्यासाठी योग्य व पुरेसे आहेत. उपरोक्त आर्थिक पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या लेखापरीक्षण अहवाल, टिप्पणी व शेऱ्यास पात्र राहून आम्ही खालील निवेदन करीत आहोत.



Scanned with CamScanner

**लेखापरीक्षकांचे मत :-**

६. आमच्या मते व आम्हांस मिळालेल्या माहिती, खुलासे व स्पष्टीकरणानुसार संस्थेची पुस्तके, नोटस टू अकाऊंट्स् एकत्रित विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, त्या अंतर्गत नियम, इतर कायदे व निबंधकाने काढलेली परिपत्रके यांना अनुसरून व सर्वसाधारणपणे भारतात स्वीकारली जाणारी अकाऊंटींग मुलतत्त्वे यांच्याशी सुसंगत अशी खरी व योग्य स्थिती दर्शवितात.

१) ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०२५ च्या अखेरच्या संस्थेच्या व्यवहाराची व २) नफा-तोटा पत्रकाच्या बाबतीत दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या कालावधीतील नफा लेखापरीक्षण अहवालास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

**इतर कायदे व नियंत्रण अहवाल :-**

७. संस्थेचे ताळेबंद व नफा - तोटा पत्रके महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार बनविलेली आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की,

अ. आमच्या समजुतीप्रमाणे व माहितीप्रमाणे लागणारी माहिती व खुलासे आम्हांस मिळाले आहेत. सदर माहिती व खुलासे लेखापरीक्षण करण्याकरीता पुरेसे आहेत.

ब. आम्ही तपासलेले संस्थेचे व्यवहार हे संस्थेच्या रोजच्या व्यवहारातील व कायदेशीर आहेत.

क. संस्थेच्या कार्यालयाकडून मिळालेली माहिती लेखापरीक्षणाकरीता पुरेसी आहे.

९. आमच्या मते संस्थेचे ताळेबंद व नफा - तोटा पत्रके संस्थेस लागू असणाऱ्या अकाऊंटींग स्टँडर्डप्रमाणे (ए.एस.३,२२ वगळता) बनविलेली आहेत.

१०. **आम्ही अहवाल देतो की,**

१. संस्थेचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रके संस्थेच्या हिशोब पुस्तकांशी जुळणारी आहेत.

२. हिशोबाच्या पुस्तकाचे तपासणीनुसार संस्थेचे महाराष्ट्र राज्य सहकार संस्था अधिनियम १९६०,अंतर्गत नियम व संस्थेचे पोटनियमानुसार योग्य ती पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत.

३. **सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षण वर्ग 'अ'देण्यात आला आहे.**

स्थळ : मुंबई ४०००९२
दिनांक : २९/०७/२०२५

**मे. किरण दामले अँड कं.**
**सनदी लेखापाल पॅनेल.क्र.अ-१७०३०**



Scanned with CamScanner

# ''सेतु एका दृष्टिक्षेपात''

(रक्कम रुपये कोटी मध्ये)

| | | | |
|---|---|---|---|
| संस्थेचे नाव | दि सेतु को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड | | |
| प्रशासकीय कार्यालय | १ व २, वैशाली अपार्टमेंटस, टि.पी.एस.III, लोकनेते अण्णासाहेब वर्तक मार्ग, बोरिवली (प). मुंबई -४०००९२, दूरध्वनी : ८१६९३७७९०८ / ०२२ - ४७५१ १८८९ | | |
| नोंदणी क्रमांक | ११६३/८४-८५ | | |
| कार्यक्षेत्र | बृहन्मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई, पालघर व ठाणे जिल्हा यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित. | | |
| शाखा | मुख्य कार्यालयासह ८ शाखा | खेळते भांडवल | रू.१८२.२५ कोटी |

| क्र. | तपशील | ३१मार्च २०२४ अखेर | ३१ मार्च २०२५ अखेर | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद | १२,५४९ | १३,२६७ | ५.७२ % |
| २. | भाग भांडवल | ५.५३ | ५.६७ | २.५३% |
| ३. | वैधानिक राखीव निधी | ८.४८ | ९.८६ | १६.२७ % |
| ४. | ठेवी | १३२.८४ | १४७.८८ | ११.३२ % |
| ५. | कर्ज वाटप | ९४.५८ | १०२.२० | ८.०६ % |
| ६. | गुंतवणूक | ६२.८४ | ६७.६५ | ७.६५ % |
| ७. | सभासद कल्याण निधी | ०.३७ | ०.३८ | २.७० % |
| ८. | सामाजिक कृतज्ञता निधी | ०.१७ | ०.१८ | ५.८८% |
| ९. | इमारत निधी | ४.४५ | ४.७० | ५.६२ % |
| १०. | निव्वळ नफा | १.७५ | २.४६ | ४०.५७ % |
| ११. | एकूण उत्पन्न | १२.१६ | १४.३३ | १७.८५ % |
| १२. | संस्था कर्मचारी वर्ग | ३४ | २९ | -१४.७१% |
| १३. | संचालक कर्ज | ०.१९ | ० | ० |
| १४. | ढोबळ अनुत्पादित कर्ज % | ४.३८ | ३.५२ | - ०.८६ |
| १५. | स्वनिधी | २३.२८ | २३.८९ | २.६२ % |
| १६. | सी.डी. रेशो % | ६०.९२ | ६०.१३ | - १.३० |
| १७. | कर्मचारी कल्याण निधी | ०.२९ | ०.३२ | १०.३४ % |
| १८. | सर्वसाधारण राखीव निधी | ०.५६ | १.१८ | ११०.७१ % |
| १९. | निवडणूक निधी | ०.०३ | ०.१४ | ३६६.६७ % |
| २०. | सहकार शिक्षण निधी | ०.१४ | ०.१५ | ७.१४ % |
| २१ | निव्वळ अनुत्पादित कर्ज % | १.४३ | ० | ० |



Scanned with CamScanner

## दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट
## ताळेबंद पत्रक

| ३१.०३.२०२४ रूपये | भांडवल व देणी | | ३१.०३.२०२५ रूपये |
|---|---|---|---|
| १०,००,००,०००.०० | **१. भाग भांडवल** | | १०,००,००,०००.०० |
| | (अधिकृत भाग भांडवल प्रत्येकी १०० रू. चे १०००००० समभाग) | | |
| ५,५२,७७,९४०.०० | वसूल भाग भांडवल | | ५,६६,८९,४४०.०० |
| | **२. गंगाजळी व इतर निधी** | | |
| ८,४८,४९,३२२.०० | वैधानिक राखीव निधी | ९,८६,६०,५१३.४० | |
| ५४,९२,०००.०० | लाभांश समयोजन निधी | ०.०० | |
| २,०७,८०,०००.०० | बुडीत कर्ज निधी | ४,०१,६७,१७७.०० | |
| ४,४५,५०,०००.०० | इमारत निधी | ४,७०,५०,०००.०० | |
| १,६३,४२,०१५.०० | इमारत घसारा निधी | ०.०० | |
| १४,४७,०००.०० | सहकार शिक्षण निधी | १५,४७,०००.०० | |
| २१,०६,०००.०० | इमारत दुरूस्ती निधी | २३,०६,०००.०० | |
| ३७,०२,०००.०० | सभासद कल्याण निधी | ३८,७६,०००.०० | |
| १७,२५,२१८.०० | सामाजिक कृतज्ञता निधी | १८,१३,११८.०० | |
| २९,००,०००.०० | कर्मचारी कल्याण निधी | ३२,००,०००.०० | |
| ३५,६७,९०६.०० | कर्मचारी उपदान निधी (ग्रॅच्युईटी) | २६,०४,०२६.०० | |
| ९०,७९,०००.०० | गुंतवणूक चढ उतार निधी | १,०५,७९,०००.०० | |
| २५,००,०००.०० | तंत्रज्ञान विकास निधी | ३५,००,०००.०० | |
| ५५,६३,७४७.०० | सर्वसाधारण राखीव निधी | १,१८,५५,७४७.०० | |
| ३,०९,५४२.०० | निवडणूक निधी | १४,५१,७४०.०० | |
| १०,५३,९९३.०० | विकास निधी | ११,३९,४९३.०० | |
| ७५,३६,०००.०० | PMC बँक तरतुद | ७५,३६,०००.०० | २३,७२,८५,८१४.४० |
| २१,३५,०३,७४३.०० | | | |
| | **३. ठेवी** | | |
| ३२,१७,२५४.०० | कर्मचारी ठेव | २१,३०,४६८.०० | |
| २,१२,६८,६१८.०० | मुदत ठेव | १,६१,२२,९८१.०० | |
| १,०३,३१,४८,६२०.०७ | संचय ठेव | १,११,१०,७७,६०५.८० | |
| १,७५,२५,५४६.०० | आवर्त ठेव | १,७१,१५,८३५.०० | |
| ४,२५,६९,६०६.०० | दैनंदिन ठेव | ४,३५,४९,९२६.०० | |
| १६,४८,९५,६३९.०१ | बचत ठेव | १७,६६,५०,८४२.०४ | |
| ३३,८२०.०० | नाममात्र सभासद बचत ठेव | ३४,६०२.०० | |
| १,७५,०८७.०० | विशेष ठेव योजना | १,७५,०८७.०० | |
| ४,५५,३४,६१९.०० | महिला विशेष ठेव योजना | ११,२०,४०,४७५.०० | १,४७,८८,९७,८२१.८४ |
| १,३२,८३,६८,८०९.०८ | | | |



Scanned with CamScanner

## सोसायटी लिमिटेड
## ३१ मार्च २०२५ अखेर

| ३१.०३.२०२४ रूपये | मालमत्ता व येणी | | ३१.०३.२०२५ रूपये |
|---|---|---|---|
| १३,२४,८७०.०० | १. रोख शिल्लक | | ३३,४९,०९१.०० |
| | २. बँक शिल्लक | | |
| ३,५९८.७४ | म.रा.स.बँक बोरिवली | ५०,०२३.३४ | |
| ३१,५६,९९९.०४ | मु.जि.म.स. बँक, बोरिवली | ८,६७,०२९.०४ | |
| १,०७,५००.६६ | ठा.जि.म.स.बँक, सफाळे | ३९,७०९.६८ | |
| १,३३,८२८.३० | ठा.जि.म.स.बँक, बोर्डी | ४७,८७९.१० | |
| १,४८,३६९.६७ | ठा.जि.म.स.बँक, चिंचणी चालु खाते | ५,४५,०६५.६३ | |
| २,८५,४८३.६८ | वसई वि.स.बँक, पालघर (माहीम साठी) | ५,०४,९२०.६६ | |
| २०,३६,०३२.९० | वसई वि.स.बँक, सफाळे | ३,४७,१००.०३ | |
| ८९,१०४.४० | बँक ऑफ बडोदा, बोईसर | ८९,१०४.४० | |
| २,५६,३५६.९६ | बँक ऑफ बडोदा, माहीम | ६,३१,४४१.७८ | |
| १,७९,८६७.३१ | बँक ऑफ बडोदा, बोर्डी | १०,८२,६१८.८५ | |
| ३,००,५८६.७२ | दि ठाणे जनता सह. बँक | ९,७५,२११.९० | |
| ६,९७,२३४.९२ | दि सारस्वत को-ऑप बँक लि., बोरिवली | ८,६३,५७३.६७ | |
| १,४८,८८९.०५ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ७१,८१४.०५ | |
| ५१,०३८.९३ | बँक ऑफ बडोदा, चिंचणी | ५,९६,५२९.९३ | |
| १४,३६,९६६.१५ | दि सारस्वत को-ऑप बँक लि., विरार | ३,६१,४३६.५९ | |
| १५,५८,०६६.७२ | बसीन कॅथोलिक को-ऑप बँक लि., बोईसर | ४,०५,३४८.७५ | |
| २६,२२,४१९.८६ | कॉसमॉस को-ऑप बँक, बोरिवली CA A/c | २०,३६,८१८.८५ | |
| ४१,८५३.८० | वसई वि.स.बँक, पालघर | १,२९,३७६.०० | |
| ० | कॉसमॉस को-ऑप बँक, बोरिवली OD A/c | २२,८८८.६९ | |
| १,१०,३४२.९२ | वसई वि.स.बँक, बोरिवली | ०.०० | |
| २,४७,०१०.८० | युनिटी स्मॉल फायनान्स (PMC) | ४,६५,५१६.२० | |
| १,२५,९१४.४४ | ठाणे जि.म.स.बँक, माहीम | १,६९,३२५.०६ | १,०३,०२,७३२.२० |
| १,३७,३७,४६५.९७ | | | |
| १८,३००.०० | ३. अधेसिव्ह स्टॅम्प | | ६२,३२०.०० |
| | ४. गुंतवणूक (भाग वर्गणी) | | |
| ४,४०,०००.०० | भाग वर्गणी - मु.जि.म.स.बँक | ४,४०,०००.०० | |
| ७५०.०० | भाग वर्गणी - वैशाली स.गृ.स.बोरिवली | ७५०.०० | |
| ५,५०,०००.०० | भाग वर्गणी - इफ्को | ५,५०,०००.०० | |
| १,०००.०० | भाग वर्गणी - पश्चिम उप. पतसंस्था फेडरेशन | १,०००.०० | |
| १००.०० | भाग वर्गणी - मु.जि.अ.को.ऑ.क्रे.सो.फेडरेशन | १००.०० | |
| ३,०००.०० | भाग वर्गणी - महाराष्ट्र राज्य स.पतसंस्था फेडरेशन | ३,०००.०० | |
| १०,०००.०० | भाग वर्गणी - डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन | १०,०००.०० | |
| २,४२,७८,४४०.०० | भाग वर्गणी - युनिटी स्मॉल फायनान्स | २,४२,७८,४४०.०० | |
| ६०,६९,६१०.०० | भाग वर्गणी - युनिटी स्मॉल फायनान्स | ६०,६९,६१०.०० | ३,१३,५२,९००.०० |
| ३,१३,५२,९००.०० | | | |
| | ५. गुंतवणूक (मुदत ठेव) | | |
| ११,००,४१,५१७.०० | मुदत ठेव - मु.जि.म.स.बँक | १२,७०,७९,०६५.०० | |
| १,२०,८८,९०६.०० | मुदत ठेव - वसई विकास सह.बँक | २५,००,०००.०० | |
| ४,७१,०८,५९८.०० | मुदत ठेव - सारस्वत बँक लि. | ११,८१,९३,१११.०० | |
| ३,८५,४९,५४२.०० | मुदत ठेव - टी.जे.एस.बी.स.बँक बोरिवली | ३,०३,००,०००.०० | |



Scanned with CamScanner

## दि सेतु को-ऑपरेटिव्ह क्रेडिट
## ताळेबंद पत्रक

| ३१-०३-२०२४ रुपये | भांडवल व देणी | | ३१-०३-२०२५ रुपये |
|---|---|---|---|
| | **५. इतर देणी व तरतुदी** | | |
| १७,९३,८६६.७७ | देय परतावा | २०,१३,९५८.७७ | |
| ४,९८,३७८.०० | उत्तरदायित्व (परिशिष्ट ''ब'' देणी I) | ६,९७,३३१.०० | |
| १,९१,६७,५००.०० | उत्पादित कर्ज तरतूद | २५,६०,०००.०० | |
| ७४,६५,९५५.०० | अनुत्पादित कर्ज तरतूद | ८१,८०,३८६.०० | |
| २,७५,०००.०० | धनको | ०.०० | |
| २,३८६.०० | देय निधी (ESIS) | १,७८८.०० | १,३४,५३,४६३.७७ |
| २,९२,०३,०८५.७७ | | | |
| ६८,५५,२७८.३१ | **६. कॉसमॉस बँक** OD A/c | ०.०० | -- |
| ०.०० | **७. वैधानिक देणी व तरतूद** | ०.०० | |
| १,३०,३८,४८६.०० | **८. अनुत्पादित कर्जावरील येणे व्याज** | १,१०,९८,१६८.०० | |
| ३,३३,५४५.०० | **९. मुदतपूर्ण ठेवी - व्याज तरतूद** | ४,२६,०५८.०० | |
| ४४,००,०००.०० | **१०. आयकर परतावा तरतूद** | ०.०० | |
| १०,९८५.०० | **११. जादा रोकड** | ११,९९३.०० | १,१५,३६,२१९.०० |
| २,४६,३८,२९४.३१ | | | |
| | **१२. नफा तोटा खाते** | | |
| ६८७.३१ | गतवर्षीय शिल्लक | ५९०.५२ | |
| १,७४,९५,९६२.२१ | चालू वर्षीय नफा | २,४६,३७,६७७.६४ | २,४६,३८,२६८.१६ |
| १६६,८४,८८,५२१.६८ | | | १८२,२५,०१,०२७.१७ |

**मे. किरण दामले अँड कंपनी**
वैधानिक लेखापरीक्षक

**सोनु आ. आरेकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**विलास पां.सावे**
तज्ज्ञ संचालक

**भालचंद्र पां. जाधव**
संचालक



Scanned with CamScanner

## सोसायटी लिमिटेड
## ३१ मार्च २०२५ अखेर

| ३१-०३-२०२४ रुपये | मालमत्ता व येणी | | ३१-०३-२०२५ रुपये |
|---|---|---|---|
| ८,७५,००,०००.०० | मुदत ठेव - शामराव विठ्ठल बँक | ९,००,००,०००.०० | |
| ०.०० | मुदत ठेव - म.स्टेट. बँक | ३,००,००,०००.०० | |
| ५,२२,८४,७९८.०० | मुदत ठेव मॅको बँक | ५,२२,८४,७९८.०० | |
| ९,३५,१०,४०९.०० | मुदत ठेव म्युनिसिपल को.ऑप.बॅक.लि | ९,३५,१०,४०९.०० | |
| ७,१२,४२,८४०.०० | मुदत ठेव एन के जी एस बी बँक | ३,१०,२०,०००.०० | |
| ८,२०,८९,०४१.०० | मुदत ठेव - कॉसमॉस बँक बोरिवली | ९,१२,०१,१५३.०० | |
| २७,००,०००.०० | Auto Sweep - कॉसमॉस बॅक बोरिवली | ४,५०,०००.०० | |
| ०.०० | मुदत ठेव डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. | १,००,००,०००.०० | ६७,६५,३८,५३६.०० |
| ५९,७१,१५,६५१.०० | | | |
| ९४,५८,२७,०१८.०१ | **६. कर्ज व अग्रीम (परिशिष्ट ''ब'' येणी )** | | १,०२,२०,१५,९३५.०६ |
| २,४४,०८,१६८.०० | **७. कार्यालयीन जागा** | २,४४,०८,१६८.०० | |
| | वजा घसारा मार्च २०२५ पर्यंत | १,७७,७६,१२५.०० | ६६,३२,०४३.०० |
| १९,७९,१११.०० | **८. फर्निचर** | १७,९४,१११.०० | |
| १,९८,०००.०० | वजा घसारा | १,८०,०००.०० | १६,१४,१११.०० |
| १७,८१,१११.०० | | | |
| ३८,६२१.३८ | **९. कार्यालयीन साधनसामुग्री** | ३४,७२१.३८ | |
| ३,९००.०० | वजा घसारा | ३,५००.०० | ३१,२२१.३८ |
| ३४,७२१.३८ | | | |
| ७,८१,४३४.५१ | **१०. संगणक व संलग्न उपकरणे** | १२,९५,७८६.५१ | |
| ३,१२,६००.०० | वजा घसारा | ५,२०,०००.०० | ७,७५,७८६.५१ |
| ४,६८,८३४.५१ | | | |
| | **११.अनामत** | | |
| ३,९८०.०० | टेलिफोन निगम | ३,९८०.०० | |
| १०,०००.०० | मुंबई महानगरपालिका | ०.०० | |
| ५,२३५.०० | रिलायन्स एनर्जी | ५,२३५.०० | |
| ४९,७६,६७७.०० | महा.राज्य विद्युत वितरण कंपनी लि. पालघर | २९,७९,३५८.०० | |
| १,००,०००.०० | चिंचणी समाज ट्रस्ट (चिंचणी शाखेची जागा) | १,००,०००.०० | |
| | चिंचणी शाखा नवीन जागा | ५०,०००.०० | |
| ५,०००.०० | डहाणू (वीज बिल क्रेंद्राची जागा) | ०.०० | ३१,३८,५७३.०० |
| ५१,००,८९२.०० | | | |
| | **१२. इतर येणी** | | |
| १,७५,८६,६३६.०० | गुंतवणूकीवरील व्याज | ३,९२,४६,३९२.०० | |
| १३,०१,१२०.९५ | आयकर परतावा | १३,६७,१०१.९५ | |
| १०,६६,०७७.६५ | विदयुत देयकांवरील कमिशन (MSEDCL) | ६,६३,७१७.६५ | |
| ३,००,०००.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज (Security Deposit) | २,००,०००.०० | |
| ०.०० | सेवा कर (म.रा.वि.वि.कं.लि.) | २,५८,०६८.४५ | |
| २२,०००.०० | लाभांश येणे | २,४०,५०५.०० | |
| ४,६३,६०२.२१ | जी.एस.टी. (म.रा.वि.वि.कं.लि.) | २,८५,७४०.५७ | |
| १,६६,५७९.०० | Adv. To Income Tax Appeal AY 2017-18 | १,६६,५७९.०० | |
